**महत्वाचे**

क्र.पोमंस/३३/७१२५/उपसहायक लेखा/२०२४

मुंबई, दिनांक २१/०८/२०२४

**विषय:-** अर्थसंकल्पीय तरतुदीच्या खर्चाबाबत नियम व कार्यपध्दतीची सखोल माहिती व आभासी वैयक्तिक ठेव लेखा (VPDA) ही व्यवस्था व कार्यपध्दती लागु करण्यासंदर्भात प्रशिक्षण आयोजित करणेबाबत.

*********

उपरोक्त विषयास अनुसरुन, सर्व घटक कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, अर्थसंकल्पीय तरतुदीच्या खर्चाबाबत प्रचलित नियम व कार्यपध्दतीची सखोल माहिती होण्यासाठी सदर कामकाज पाहणा-या अधिकारी /लिपीक कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने, **अर्थसंकल्पीय तरतुदीच्या खर्चाबाबत नियम व कार्यपध्दतीची सखोल माहिती** होण्यासाठी तसेच वित्त विभाग शासन निर्णय, दि.१४ फेब्रुवारी, २०२४ नुसार सहायक अनुदानाच्या जलद संवितरण व संनियंत्रणासाठी आहरण व संवितरण अधिकारी आणि अन्य अशासकीय कार्यान्वयन प्राधिकारी यांचे करिता आभासी वैयक्तिक ठेव लेखा (VPDA) ही व्यवस्था व कार्यपध्दती लागु करणेबाबत संबंधित लेखाशाखेचे कामकाज पाहणा-या **सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) / पोलीस उप अधीक्षक (गृह) तसेच सहायक लेखा अधिकारी / संबंधित कार्यासन अधिकारी (AO आणि OS) तसेच संबंधित जबाबदार लिपिक वर्ग** यांचे दि.२३/०८/२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षण सकाळी ११.०० ते १३.३० वा. पावेतो घेण्यात येईल.

तरी उपरोक्त नमूद प्रशिक्षणाकरिता **सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) / पोलीस उप अधीक्षक (गृह) / सहायक लेखा अधिकारी/ कार्यासन अधिकारी तसेच संबंधित जबाबदार कर्मचारी** यांना उपस्थित रहाणेबाबत सुचना देण्यात याव्यात. ऑनलाईन लिंक सर्व घटकांना दि.२३/०८/२०२४ रोजी सकाळी उपलब्ध करुन देण्यात येईल.

२१/८/२४

(डॉ. निखिल गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, यांचेकरिता.

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल/वाहतूक/फोर्स वन/आर्थिक गुन्हे शाखा/नागरी हक्क संरक्षण/प्रशिक्षण व खास पथके/ लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म.रा., पुणे

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला बाल अत्याचार प्रतिबंधक, म.राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प, नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, रारापोबल, पुणे / नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गासह)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र.१ ते १९
सर्व प्राचार्य, पो.प्र.वि., (राज्य राखीव पोलीस प्रशिक्षण केंद्र नानवीज सह)
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्र.केंद्र नागपूर / गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण शाळा, नाशिक.
कार्यासन अधिकारी, का.क्र.१७, १७अ, १८, १९, १९अ, २१, २७, २८,२८अ, ३१, ३२, ४०
कार्यासन अधिकारी, का.क्र.१९

२/- यांना कळविण्यात येते की, सदरचे प्रशिक्षणासाठी दि.२३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० ते १३.३० वाजेपर्यंत पहिल्या मजल्यावरील सभागृहाची व्यवस्था आरक्षित ठेवण्यात यावी.

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोमसं, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२/- यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश दि.२४/०८/२०२४ पर्यंत "Training on Budget expenditure and VPDA System" इंग्रजीमध्ये तसेच अर्थसंकल्पीय तरतुदीच्या खर्चाबाबत नियम व कार्यपध्दतीची सखोल माहिती व आभासी वैयक्तिक ठेव लेखा (VPDA) ही व्यवस्था व कार्यपध्दती या शिर्षाखाली मराठीमध्ये प्रसिध्द करावे.